Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Volume-3, Issue-3, Sept-2013

Available online at www.aygrt.isrj.net

महाराष्ट्राच्या साखर उद्योगाची सद्यस्थिती व भवितव्य

नितीन मुटकुळे
द.ग.तटकरे महाविदयालय माणगांव. जि. रायगड

ÃÖÖ¸Ö¿Ö :- महाराष्ट्र हे सहकारी चळवळीच्या बाबतीत देशातील पहिले व अग्रगण्य राज्य आहे. सहकारी चळवळीचा १०५ वर्षांचा इतिहास आहे. महाराष्ट्रात पहिली शेती पतपुरवठा सहकारी संस्था धारवाड जिल्हयात 'कणगीहाळ ' येथे १९०५ मध्ये स्थापन –ाली राज्याच्या ग्रामीण भागातील पद्दलित, अल्पसंख्याक, शेतमजूर व लहान शेतकऱ्यांना एकत्र करून आर्थिक उन्नतीचा मार्ग सहकाराने दाखवला आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात सहकार चळवळीचे योगदान महत्वाचे आहे. महाराष्ट्रातील संतांनी एकतेची आणि दुसऱ्या साठी त्याग करण्याची शिकवन दिली आहे. समर्थ रामदासांनी "दुसऱ्याच्या सुखात सुख मानावे, दुसऱ्याचे दुःख जाणून घ्यावे आणि समुदायाच्या बरेवाईट पणात सहभागी व्हावे " असे सांगितले तर संत तुकाराम महाराजांनी "एकमेका साहय करू, अवघे धरू सुपंथ " असा सहकारी युगाचा संदेश दिला.

प्रस्तावना :-

´ÖÆÖ¸ÖÃ™ÖÝÖß»Ö साखर उद्योग हा आर्थिक, सामाजिक आणि राजकीय दृष्टीने अत्यंत महत्वाचा उद्योग आहे. सहकारी साखर करखान्यांनी महाराष्ट्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ग्रामीण भागात पाणीपुरवठा संस्था, पतपुरवठा संस्था, दूधउत्पादक संस्था इ. शेतीशी निगडीत सहकारी संस्था निर्माण –ाल्या आहेत. महाराष्ट्रात सहकारी कारखनदारीमुळे अल्कोहोल, वीज निर्मिती, कागद, ॲसिड, पशुखाद्य, मिठाई, खत उद्योग इत्यादी उद्योगामुळे ग्रामीण विकासाला हातभार लागला आहे. वाढत्या स्पर्धेमुळे साखर उद्योग काहीसा समस्येच्या गर्तेÿÖ ÃÖÖ¯Ö›»ÖÖ आहे. साखरेची वैधानिक किंमत क्रेंद्र व राज्य सरकारचे नियंत्रण मुक्त धोरण, यामुळे सहकारी साखर कारखाणदारी अधिक अडचणीत येत आहे. सहकारी साखर उद्योगाच्या विकासासाठी शासनाने प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

शोधनिंबधाची उद्दिष्टे :- प्रस्तूत शोध निबधांची उष्टिे पुढील प्रमाणे मांडली आहेÿÖ.
१) महाराष्ट्रातील साखर उद्योगाच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे.
२) महाराष्ट्रातील साखर उद्योगाच्या समस्येवर आणि भवितव्याबाबत उपाययोजना सुचवणे.

*** महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योगाची ऐतिहासिक पा¿ÖÖ³Ö´ÖÖ :-**

महाराष्ट्रात पहिला साखर कारखाना ब्रिटिशांनी १९१९ मध्ये हरेगाव (अहमदनगर जिल्हा) येथे सुरू केला. सहकारी क्षेत्रामध्ये साखर कारखाना उभारणीची कल्पना १९१२ मध्ये श्री. आर.एन. हिरेमठ आणि जी. एन सहस्त्र बुध्दे यांनी मांडली. सहकार तज्ञ लल्लूभाई समळदास आणि जी. एन. सहस्त्र बुध्दे यांनी मूर्त रूप देण्याचे काम केले. त्यांनी १९१८ मध्ये 'दि निरा व्हॅली सहकारी साखर कारखाना ' या नावाने बारामती येथे सहकारी तत्वावर पहिला साखर कारखाना सुरू केला. परंतु हा कारखाना बंद पडला. १९३३ ते १९३४ या काळात सहा नवीन कारखाने निघाले १९४१ पर्यंत महाराष्ट्रात १२ साखर कारखाने कार्यरत होते. सन १९५० मध्ये सहकार महर्षी पदमश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी अहमदनगर जिल्हयातील प्रवरानगर - (लोणी) या ठिकाणी र्प्रवरा सहकारी साखर कारखाना सुरू केला. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योगाला प्रेरणा या कारखाण्यामुळे मिळाली. त्यांनतर दुसरा सहकारी साखर कारखाना सांगली या ठिकाणी पद्मभूषण वसंतदादा पाटील यांनी "शेतकरी सहकारी साखर कारखाना" स्थापना करुन सहकारी साखर चळवळीला दिशा दिली. महाराष्ट्रात सन १९५० ते १९५५ या काळात एकूण १५ कारखाने साखर उत्पादन करीत होते. त्यापैकी सहकारी क्षेत्रामध्ये दोन साखर कारखाने होते. त्यानंतर साखर कारखाण्यांची वेगाने वाढ होत गेली.

महाराष्ट्रातील साखर उत्पादनाची स्थिती (१९६०-61 ÿÖ 2010-11)
महाराष्ट्रातील साखर उत्पादन.(क्षेत्र ००० हेक्टर, उत्पादन ००० मे. टन)

¾ÖÃÖ	तोडणीक्षेत्र	उत्पादन	दर हेक्टरी उत्पादन
1960-61	155	10404	66.92
1970-71	167	14433	86.53
1980-81	258	23706	91.74
1990-91	442	38154	86.40
2000-01	595	49569	83.26
2001-02	553	29971	50.74
2002-03	537	27590	51.49
2003-04	526	26982	51.31
2004-05	327	23914	73.00
2005-06	501	38814	77.47
2006-07	849	66217	78.06
2007-08	1093	88437	80.91
2008-09	768	60648	70.96
2009-10	756	64159	84.86
2010-11	965	85961	88.80

Ãï¿ÖÝÖ - महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००१-10

वरील तक्त्यामध्ये सन 1960-61 Ÿõ 2010-११ या काळातील उसाचे तोडणी क्षेत्र, साखर उत्पादन आणि दर हेक्टरी उत्पादन दर्शविले आहे. १९६०-६१ या वर्षी महाराष्ट्रत उसाचे तोडणी क्षेत्र १५५ लाख हेक्टर इतके असून उत्पादन १०४०४ लाख मे. टन उत्पादन –ाले. याच वर्षी दरहेक्टरी उत्पादन ६६.९२ मे.टन इतके –õõ»õ †õÆ. Ÿõ¸ 2010-११ या वर्षी ऊसाचे तोडणी क्षेत्र, उत्पादन आणि दर हेक्टरी उत्पादन यांत –ालेली वाढ अनुक्रमे ९६५ लाख हेक्टर, ८५९६१ लाख मे.टन आणि ८८.८० मे.टन असल्याचे स्पष्ट –õõ»õ.

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाण्यांची अलिकडील काळातील ठळक वैशिष्टे

		31 ´00"0 2006	31 ´00"0 2007	31 ´00"0 2008	31 ´00"0 2009	31 ´00"0 2010	31 ´00"0 2011
1	नोंदणीकृत कारखाने	202	202	201	201	202	202
2	उत्पादन चालू असलेले कारखाने	142	163	145	144	111	123
3	ऊस उत्पादक सदस्य संख्या	33000	33000	2076000	2126000	1870000	2122000
4	प्रतिदिन गाळप क्षमता (लाख मे. टन)	4.49	4.56	4.72	4.74	4.87	5.12
5	गाळम –ालेला ऊस (लाख मे.टन)	445.71	798.83	761.74	400.42	614.47	802.52
6	ऊसाचा दर (प्रति मे.टन रूपये) †) ‰ Ãõõ"00 Ãõ¸õÃõ¸õ ¤¸¡ ब) प्रत्यक्षात दिलेला सरासरी ¤¸¡	802.50 1200	811.80 1150	650 1200	812 1200	1298 2100	1391 2048
7	साखर उत्पादन (लाख मे. टन)	51.98	91.00	90.98	46.14	71.06	90.72
8	A0¸0A0¸0 ^Y00¸0	11.68	11.39	11.94	11.52	11.56	11.30
9	मळी (लाख मे. टन)	17.24	28.86	30.62	16.02	16.5	32.01
10	कारखाण्यांची संख्या - अ) आसवनी प्रकल्प असलेल्या ब) वीजनिर्मिती प्रकल्प असलेल्या	58 19	58 19	58 21	58 21	64 27	65 32
11	वीजनिर्मिती (दशलक्ष युनिट)	257.83	375.75	118	231.5	349	425
12	नफ्यातील कारखाने (संख्या)	23	28	-	-	-	-
13	तोटयातील कारखाने (संख्या)	116	111	103	112	40	48

Ã¡õõÿõ :- साखर आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय महाराष्ट्र शासन.

वरील तक्त्यामध्ये महाराष्ट्रातील साखर कारखाण्यांच्या अलिकडील काळातील ठळक घडामोडींचे अध्ययन करण्यात आले आहे. यामध्ये नोंदणीकृत कारखाने, यापैकी उत्पादनी चालू असलेले कारखाने, ऊस उत्पादक सभासद, कारखाण्यांची गाळप क्षमता, ऊसाचा दर, प्रत्यक्ष सभासदांना दिलेला सरासरी दर, साखर उत्पादन, उतारा, मळी, वीजनिर्मिती, नफ्यातील आणि तोटयातील साखर कारखाने या वैशिष्टयांवर प्रकाश टाकला आहे.

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाण्यांच्या वर्तमानकालीन समस्या :-

1)किमान आधारातून/वैद्यानिक किंमत :- केंद्र सरकार १९६६ च्या ऊस नियंत्रण कायद्यानुसार प्रत्येक हंगामासाठी ऊसाची आधारातून किंमत ठरवते. ही किंमत कृषी मूल्य आयोगाच्या भूमिकेवर अवलंबून असते. ऊस उत्पादनकांना ऊसाच्या दराची हमी मिळावी यासाठी महत्वाची असते. ऊसाची किमान आधारभूत किंमत निश्चित करताना ऊस उत्पादन, त्याची किंमत, इतर वस्तूंच्या किंमती, ऊसाचा सरासरी साखर उतारा, तयार साखरेची किंमत व बाजारपेठेतील साखरेची उपलब्धता या बाबीबरोबरच उत्पादक सभासदाच्या दृष्टीने वाढती महागाई, ऊसाची लागवड, खते, मशागत, पाणी, औषधे किटकनाशके इ. खर्चाचा विचार करणे आवश्यक असते. मात्र ऊसाची किमान आधारभूत किंमत निश्चित करताना या बाबींचा विचार केला जात नाही Æõ शोकांतिका आहे.

2) वीज निर्मिती :- महाराष्ट्रातील सध्याची वीज निर्मिती व वीजेचा वापर यामध्ये प्रचंड तफावत आहे. सध्या शहरात ४ ते ८ तास व ग्रामीण भागात १२ ते १६ तास भारनियमण करावे लागते. जर भारनियमणात काही तांत्रिक बिघाड –ाला तर ४ ते ५ दिवस वीज उपलब्ध होत नाही. वीज नाही म्हणून पाणी नाही, पाणी नाही म्हणून शेती नाही. यामुळे ऊसाच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. महाराष्ट्रातील साखर कारखाने हे वीज निर्मितीचे मोठे स्त्रोत आहेत. सहवीज निर्मितीसाठी नियोजन, धोरण ठरवणे आवश्यक आहे.

3) भ्रष्टाचार व तोटयातील कारखाने :- महाराष्ट्रातील २२ सहकारी साखर कारखाण्यांच्या नमुना लेखा परीक्षणात असंख्य गंभीर बाबी दिसून आल्या. यात संचालक मंडळातील व्यक्तीच्या ³õÂ™õचार, यामुळे तोटयात चाललेली सहकारी कारखाण दारी ही विशेष महत्वाची बाब आहे. याला सरकारही जबाबदार आहे. ६१ कारखाण्यांनी गेल्या २० वर्षात लेख परीक्षण केले नाही ही अतिशय गंभीर बाब आहे.

*** शिफरशी / उपाययोजना** :- महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाण्यांच्या समस्यांचे अध्ययन केल्यानंतर साखर उद्योगात सुधारणा होण्यासाठी पुढील शिफारशी सुचविता येतील -

१) महाराष्ट्रात यापुढे नवीन साखर कारखाने स्थापन करू नयेत.
२) आजारी साखर कारखाने खाजगी तत्वावर चालविण्यासाठी द्यावेत.
३) सहकारी साखर कारखाण्यांनी किमान वैद्यानिक दराचे तंतोतंत पालन करावे.
४) कारखाण्यातील यंत्रसामुग्री, कामगारांचे वेतन , वीज, पाणी, ऊस तोडणी, वाहतूक खर्च त्वरित अदा करून साखर कारखाण्यांबाबत विश्वासाचे वातावरण निर्माण करावे.
५) साखर निर्याती बाबत योग्य धोरण तयार करून त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.
६) प्रत्येक साखर कारखाण्यांने दरवर्षी लेखा परीक्षण करणे सक्तीचे करावे. यामुळे भ्रष्टाचाराला आळõ ²õÃõõ»õ.
७) सहकारी साखर कारखाण्यांना पेपर, पशुखाद्य, खते, इंधन व रसायन, वीज द. उपपदार्थ निर्मितीसाठी प्रोत्साहन देणे आवश्क आहे.
८) सहकारी साखर कारखाण्यांनी स्वत:ची तांत्रिक क्षमता सुधारण्यासाठी कामगारांना प्रशिक्षण, चर्चासत्रे, कार्यशाळाचे आयोजन करणे आवश्यक आहे.
९) आजारी कारखाण्यांच्या भाग भांडवलावर सरकारने पाणी सोडावे.
१०) सहकारी साखर कारखाण्यांनी ऊस उत्पादकांची ऊसाची रक्कम त्वरित देणे आवश्यक आहे. आजही काही सहकारी साखर कारखाने २ ते ३ वर्ष उत्पादकांचे पैसेच देत नाही.
११) साखर कारखान्यांनी साखरेचे अधिक उत्पादन करण्यासाठी ऊसाच्या संकरित जातीचे संशोधन करून ऊस उत्पादकांना अधिक उत्पादनासाठी प्रवृत्त करावे.

´õÆराष्ट्रातील सहकारी साखर उद्योगाला संकटातून वाचवण्यासाठी वरील शिफारसीची अंमलबजावणी करणेही तितकेच महत्वाचे आहे.

Ä0¤³0 Ä0"08 :-

१) रसाळ राजेंद्र (२००६) भारतीय अर्थव्यवस्था, सक्सेस पब्लिकेशन, पुणे.
२) महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एक दृष्टीक्षेप, सन २००७.
३) साखर आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय महाराष्ट्र शासन.
४) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०००-01 Ÿ0 2009 -10.
5) †£0Ä0¼0¤"0 ×¼0वध अंक.